MAHAGENCO

क्र.महानिर्मिती/का.सं./मा.सं./

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**

प्रकाशगड, दुसरा मजला, वांद्रे (पुर्व),

मुंबई - ४०० ०५१

दिनांक : 24/04/2008

**प्रशासकीय परिपत्रक 60**

विषय :- पदोन्नतीकरीता पाळावयाचे निकष

महानिर्मिती कंपनीत पदोन्नतीसाठी जे निकष पाळण्यात येतात ते खालीलप्रमाणे आहेत.

## १) निवड पदे (Selection Post)

- या पदा वरील निवडीसाठी गुणवत्ता -नि-जेष्ठता नी पात्रता हे सूत्र लागू आहे.
- गुणवत्ता विचारात घेण्यासाठी गेल्या ५ वर्षातील गोपनीय अहवाल तपासण्यात येतात.
- गोपनीय अहवालाच्या प्रतवारीनुसार खालील प्रमाणे गुण देण्यात येतात.

| | | |
|---|---|---|
| अति उत्कृष्ट / अति उत्तम व तत्सम | - | ५ |
| खुप चांगले / अतिशय चांगले व तत्सम | - | ४ |
| चांगले | - | ३ |
| साधारण | - | २ |

- वरील प्रतवारीनुसार येणाऱ्या गुणांची बेरीज १७ असल्याशिवाय त्या अधिकाऱ्याचा पदोन्नतीसाठी विचार करण्यात येत नाही.
- याशिवाय इतर शर्ती व अटी जसे दक्षता कक्षाचा अहवाल / शिस्तभंग विषयक कार्यवाहीचा अहवाल / प्रकृती विषयक अहवाल इत्यादी लागु राहतात.
- अनुभवातील अटी शिथिल करण्याविषयी पदोन्नती समितीची शिफारस असली तरीही उर्वरित सर्व अटी मात्र लागु करण्यात येतात.

## २) बिगर निवड पदे (Non Selection posts)

- या पदाकरीता जेष्ठता नी पात्रता (Seniority-cum-fitness) हे सूत्र लागु करण्यात येते.
- गुणवत्ता विचारात घेण्यासाठी गेल्या ३ वर्षातील गोपनीय अहवाल तपासले जातात.
- गोपनीय अहवालाच्या वर्गवारीनुसार खालील प्रमाणे गुण देण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| अति उत्कृष्ट / अति उत्तम | - | ५ |
| खुप चांगले / अतिशय चांगले | - | ४ |
| चांगले | - | ३ |
| साधारण | - | २ |

- वरील वर्गवारीवर येणाऱ्या गुणांची बेरीज ९ असल्याशिवाय व मागासवर्गीसाठी बेरीज ८ असल्याशिवाय त्या अधिकाऱ्याचा / कर्मचाऱ्याचा पदोन्नतीसाठी विचार करण्यात येत नाही.
- याशिवाय इतर शर्ती व अटी जसे दक्षता कक्षाचा अहवाल / शिस्तभंग विषयक कार्यवाहीचा अहवाल / प्रकृती विषयक अहवाल इत्यादी लागु आहेत.
- अनुभवातील अटी शिथिल करण्याविषयी शिफारस असली तरीही उर्वरित सर्व अटी मात्र लागु राहतात.

प्रत्येक पदाच्या पदोन्नतीच्या निवडीसाठी एकूण आवश्यक असणाऱ्या गुणाच्या विषयीचा सविस्तर तक्ता सोबत जोडल्या प्रमाणे आहे.

३) गोपनीय अहवालाशिवाय इतर निकष

- शासन निर्णय व प्रशासकीय परिपत्रक क्रमांक २० दिनांक १३.११.२००६ अन्वये सादर केलेले विचारात घेतले जाते. सदरचे प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांचा राखीव आणि सेवाजेष्ठतेनुसार बिनराखीव पदासमोर पदोन्नतीसाठी विचार केला जात नाही.

- **दक्षता व शिस्तभंग विषयक कक्षाकडून ना हरकत प्रमाणपत्र येणे आवश्यक असते.**

- **संबंधित पदाकरीता आवश्यक असणाऱ्या सर्व शर्ती व अटी (शिक्षण, पात्रता, अनुभव व प्रशिक्षण) लागु राहतात.**

सदरचे परिपत्रक पारदर्शकतेच्या दृष्टीने सर्वांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

( अरविंद चौधरी )
कार्यकारी संचालक (मासं)

प्रति,
प्रेषण यादीप्रमाणे.

# तक्ता

## कार्यकारी अभियंता व तत्सम दर्जा पर्यंतची बिगरनिवड पदे

| अ.क्र. | संवर्ग | मागील ३ वर्षाच्या गोपनीय अहवालाचा निकष | शेरा |
|---|---|---|---|
| १. | अर्हताधारक खुला प्रवर्ग | ९ गुण | |
| २. | अर्हताधारक मागास प्रवर्ग | ८ गुण | |
| ३. | अर्हतारहित खुला प्रवर्ग | १० गुण | |
| ४. | अर्हतारहित मागास प्रवर्ग | ९ गुण | |
| ५. | सहाय्यक अभियंता पर्यंत पदविकाधारक | ९ गुण | |
| ६. | उप कार्यकारी अभियंता आणि त्यावरील पदविकाधारक (खुला प्रवर्ग) | १० गुण | |
| ७. | सहाय्यक अभियंता पर्यंत पदविकाधारक (मागास प्रवर्ग) | ८ गुण | |
| ८. | उप कार्यकारी अभियंता आणि त्यावरील पदविकाधारक (मागास प्रवर्ग) | ९ गुण | |

## आस्थापना अधिकारी तत्सम ते कार्यकारी संचालक दर्जा पर्यंतचे अधिकारी

| अ.क्र. | संवर्ग | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाचा निकष | मागास प्रवर्ग राखीव पदे |
|---|---|---|---|
| १. | आस्थापना अधिकारी आणि तत्सम | १७ गुण | १६ गुण |
| २. | सह संचालक आणि तत्सम | १८ गुण | १७ गुण |
| ३. | महाव्यवस्थापक आणि तत्सम | १९ गुण | १८ गुण |
| ४. | मुख्य महाव्यवस्थापक | २० गुण | १९ गुण |
| ५. | कार्यकारी संचालक | २२ गुण | २१ गुण |